हैं तय्यार हम...

Aurangabad #BhagoRe!
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
21km
17 Dec 2017
DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon
लोकमत

१७ डिसेंबर रोजी औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये धावण्यासाठी सज्ज असलेले ए. एस. रनर ग्रुपचे सदस्य. नितेश नेवलीकर, प्रशांत मुंढे, अमोल मगर, भारत रेड्डी, शेख सलमान, शेख आमेर, शेख लतिफ, राहुल शेळ्के, शेख सलीम, शेख आतेर, शेख रेहान, अजहर खान.

गरवारेतर्फे बालोत्सवाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : गरवारे कम्युनिटी सेंटरचे गरवारे बालभवनतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी दि.१४ नोव्हेंबर रोजी बालदिनानिमित्त बालोत्सव-२०१७ चे आयोजन करण्यात आले आहे. मुलांची निरागसता, संघभावना, सृजनशीलता, शारीरिक व्यायाम जोपासण्याकरिता आणि त्यांच्या कलागुणांना वाव देण्याकरिता विविध कार्यक्रमांचे तसेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम मोफत असून, कोणत्याही शाळेतील इयत्ता दसरी ते सातवीचे विद्यार्थी या उपक्रमात सहभागी होऊ शकतात. यामध्ये स. ९ ते दु. १२ या वेळेत पारंपरिक खेळ, चित्रकला, फेसपेंटिंग हे उपक्रम होतील. सायं. ५.३० ते ८ यावेळेत सामूहिक लोकनृत्य होईल, अशी माहिती सुनील सुतवणे यांनी दिली.

नॅपकीन व्हेंडिंग मशीनची सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शारदा मंदिर विद्यालयात जायंटस् ग्रुप ऑफ औरंगाबाद प्राइडतर्फे सॅनिटरी व्हेंडिंग मशीन व डिस्पोझेबल मशीनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नुकतेच या मशीनचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी जायंटस् ग्रुपचे पदाधिकारी सरिता मालानी, भाग्यश्री काबरा, स्वाती खटोड, पल्लवी मालानी, निखिल सारडा, अभय शहा, डॉ. सीमा लटुरिया उपस्थित होते.

ज्येष्ठ नागरीकांसाठी
नि:शुल्क डोळ्यांची तपासणी
वय ५० व त्यापुढील
11 नोव्हेंबर 2017 रोजी
सकाळी 10 ते सांय. 6
EYE Q
आय-क्यू सुपर स्पेशॅलिटी नेत्र रुग्णालय
नोंदणी शुल्क रु ३०/-
पहिला मजला, साई बिझनेससेंटर, हॉटेल यशोदीप शेजारी,सेव्हन हिल उड्डान पुलाजवळ, जालना रोड, औरंगाबाद . संपर्क : 0240-6600443.
मोतिबिंदू । रेटिना । लेसिक । काचबिंदू । जनरल आय चेकअप । औषधे । ऑप्टिकल्स

लोकमत समूह औरंगाबादेत रुजवतोय 'रनिंग संस्कृती'

धावपटूंत उत्सुकता : ३ आणि ५ कि. मी. धावमार्गावर असणार धमाल

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : लोकमत समूहाने अनेक समाजोपयोगी आणि अनेक प्रतिष्ठित स्पर्धांचे आयोजन करून शहरातील कलावंत व खेळाडूंना व्यासपीठ मिळवून दिले आहे. आता १७ डिसेंबर रोजी सॅफरॉन लॅण्डस्मार्क प्रस्तुत औरंगाबाद महामॅरेथॉनचे आयोजन करून नागरिकांत तंदुरुस्तीचा नवा संदेश देत असतानाच ऐतिहासिक शहरात फिटनेससाठी 'रनिंग संस्कृती' रुजवण्याचे उल्लेखनीय कार्य करीत आहे. विशेष म्हणजे ३ कि. मी. आणि ५ कि. मी. धावमार्गावर धमाल असल्यामुळे धावपटूंत उत्साह, उत्स्फूर्तता व ऊर्जा यांचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे.

औरंगाबाद शहरात फिटनेसविषयी प्रचंड जागरूकता निर्माण झाली आहे आणि त्यात लोकमत समूहदेखील महामॅरेथॉनचे आयोजन करुन नागरिकांमध्ये तंदुरुस्तीचे महत्त्व रुजवण्यासाठी महत्त्वाचे योगदान देत आहे. शहरातील विद्यापीठ परिसर, गारखेडा येथील विभागीय क्रीडा संकुल, सिडकोतील गरवारे क्रीडा संकुल येथे भल्या पहाटेच हजारो नागरिक, खेळाडू तंदुरुस्तीसाठी धावत आहेत. यात विशेष म्हणजे पूर्णच्या पूर्ण कुटुंबदेखील आपले आरोग्य चांगल्यासाठी फिटनेस करतानाचे चित्र आहे. विशेषत: नागरिकांत ५ कि.मी. व ३ कि.मी. धावण्याचा सराव करणाऱ्यांची संख्या शहरात प्रचंड आहे आणि औरंगाबाद येथे लोकमत समूहातर्फे आयोजित १७ डिसेंबर रोजी होणारी महामॅरेथॉनदेखील कुटुंब, नागरिक आणि खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहे. ३ कि.मी. फॅमिली रनमध्ये आई, वडील व १२ वर्षांखालील २ मुले यांचा समावेश आहे.

गतवर्षीच्या मॅरेथॉनमध्ये ३ आणि ५ कि. मी.च्या मार्गावर धमाल, मस्ती आणि मजा यांचा अवर्णनीय असा सुरेख मिलाफ होता. अफलातून असे सांस्कृतिक कला सादर करणाऱ्यांनी या मॅरेथॉनमध्ये धमाल उडवून दिली होती. त्यामुळे ५ आणि ३ कि. मी. सहभागी होणाऱ्या धावपटूंत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. औरंगाबाद येथे १७ डिसेंबर रोजी महामॅरेथॉन होणार असल्याची घोषणा होताच सराव करणाऱ्यांत प्रचंड वाढ झाली. गत वेळेप्रमाणेच शहरातील विविध खेळांतील खेळाडूंमध्येही या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याची उत्सुकता वाढली आहे.

फन रन

05 कि.मी. १२ वर्षांपुढील पुरुष, महिला, मुले, मुली सहभाग घेऊ शकतात.

फॅमिली रन

03 कि.मी. आई-वडील व १२ वर्षांआतील दोन मुले

ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

औरंगाबाद	कोल्हापूर	नागपूर
17/12/2017	28/01/2018	11/02/2018

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso Ricebran Oil
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

स्पर्धा
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२२०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

झेडपीत अधिकाऱ्यांचे सँडवीच : अध्यक्ष देवयानी डोणगावकर यांनी दिली संतप्त प्रतिक्रिया

बंब यांना काय साधायचे आहे?

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आमदार प्रशांत बंब यांनी जिल्हा परिषदेत बैठक घेऊन खर्चाचा आढावा घेतला. नवीन सदस्य मंडळ अस्तित्वात आल्यानंतर जिल्हा परिषदेत आजपर्यंत एक रुपयाचे देखील नियोजन झालेले नाही, यामुळे बंब यांनी अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघाडणी केली. नेमकी हीच बाब अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर यांना खटकली. आमदारांना अशा प्रकारच्या आढावा बैठका घेता येतात का? पदाधिकाऱ्यांच्या अपरोक्ष बैठक घेऊन आमदार बंब यांना नेमके काय साध्य करायचे होते? आम्ही निष्क्रिय आहोत, हेच त्यांना दाखवायचे असेल, तर त्यांनी आपल्या मतदारसंघात किती कामे मार्गी लागली हे अगोदर पाहावे, अशी संतप्त प्रतिक्रिया अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर यांनी व्यक्त केली.

अध्यक्षा डोणगावकर म्हणाल्या की, जिल्हा परिषदेत शिवसेना-काँग्रेसची सत्ता आहे. आम्ही सत्ता स्थापनेसाठी भाजपला सोबत घेतले नाही. त्यामुळे शिवसेनेला बदनाम करण्यासाठी भाजपचे आमदार प्रशांत बंब यांनी जिल्हा परिषदेत येऊन परस्पर आढावा बैठक घेतली असावी. बैठक घ्यायचीच होती, तर आम्हाला निमंत्रित करायला हवे होते. परंतु, अशा प्रकारची आढावा बैठक आमदारांना घेता येत नाही. उद्या ऊठसूठ प्रत्येक आमदार येऊन बैठका घेत राहतील. आम्ही जिल्हा परिषदेचा कारभार हाकण्यासाठी समर्थ आहोत ना. 'जीएसटी' व नवीन 'डीएसआर'मुळे कामे खोळंबली आहेत. त्यावर मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आम्हालाही वेळेत निधी खर्च व्हावा, असे वाटत नसेल का, असेही त्या म्हणाल्या.

या बैठकीसंबंधी अध्यक्षांनी प्रशासनालाही जाब विचारला आहे. कोणत्या अधिकाराखाली आमदार बंब यांची बैठक आयोजित करण्यात आली होती? मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह जिल्हा परिषदेतील झाडूनपुसून संपूर्ण विभागप्रमुख या बैठकीला उपस्थित कसे राहिले? तेव्हा सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी मंजूषा कापसे यांनी उत्तर दिले की, कोणत्याही आमदारांना थेट आढावा बैठक घेता येत नाही. चार-पाच दिवसांपूर्वी आमदार बंब यांचे यासंबंधीचे पत्र प्रशासनाला प्राप्त झाले होते. तेव्हा त्यांना निरोप देण्यात आला होता की, जिल्हा परिषदेत आढावा बैठक घ्यायची असेल, तर अगोदर जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागेल. आढावा बैठक न घेता आपण चर्चेला येऊ शकता. यापूर्वीही अनेक आमदारांनी जिल्हा परिषदेत येऊन सीईओंसोबत चर्चा करुन गेले आहेत.

एकीकडे, आढावा बैठकीत जिल्हा परिषदेचे अधिकारी निष्क्रिय आहेत. येत्या तीन महिन्यांत कामांचे नियोजन करुन ती मार्गी लावा, नाही तर संबंधित अधिकारी त्यास जबाबदार राहील. मला रिझल्ट हवाय. तीन महिन्यांनंतर पुन्हा मी बैठक घेणार आहे, याकडे आमदार प्रशांत बंब यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.

दुसरीकडे, बंब यांच्या बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल अध्यक्षांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. सध्या आमदार आणि अध्यक्षांच्या भांडणात जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांचे मात्र सँडवीच झाले आहे.

खैरेंसमोर सारेच उमेदवार फिके

- आमदार बंब हे विधिमंडळाच्या ईजीएस कमिटीचे चेअरमन आहेत. त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. या नात्याने त्यांनी बैठक घेतली असेल, याकडे अध्यक्षांचे लक्ष वेधले. तेव्हा डोणगावकर म्हणाल्या की, जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेतून विहिरी खोदल्या आहेत. स्वत:चे पैसे विहिरींसाठी गुंतवले आहेत; परंतु मागील दोन-तीन वर्षांपासून त्यांना निधी मिळालेला नाही. याकडे ते दुर्लक्ष करीत आहेत.
- बंब यांनी मतदारसंघात दिलेल्या आश्वासनांपैकी आतापर्यंत किती कामे केली, याची चाचपणी ते करीत नाहीत. आमदार बंब हे आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार आहेत का, याकडेही अध्यक्षांचे लक्ष वेधले. तेव्हा त्या म्हणाल्या, आजपर्यंतचा इतिहास सांगतो की, खासदार चंद्रकांत खैरे यांच्यासमोर जिल्ह्यातील कोणत्याही पक्षाचा उमेदवार टिकलेला नाही. बंब यांच्यासारखे कितीही आले, तरी खैरेंचा विजय निश्चितच आहे.

शिवसेनेला अस्तित्वाची भीती

- आमदार बंब म्हणाले, लोकसभा निवडणूक लढण्याचे माझ्या ध्यानीमनी नाही. एक मात्र खरे आहे की, शिवसेनेला आपल्या अस्तित्वाची भीती आहे. त्यांनी विकासकामांची स्पर्धा करावी. त्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आहेत. त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. त्यांनीही माझ्या मतदारसंघात जाऊन बैठका घ्याव्यात. मी लोकांना केलेल्या कामांचा हिशेब देईन. तुम्हीही हिशेब द्या. बैठका घेण्याचा मला छंद नाही. उलट त्यांनी जे काम करायला हवे होते, ते केले नाही. त्यामुळे मला बैठक घ्यावी लागली.
- जिल्हा परिषदेत माझ्या पक्षाचे २३ सदस्य आहेत. आजपर्यंत एकाही पैशाच्या कामाचे नियोजन झालेले नाही. माझ्या सदस्यांना उघड्यावर टाकून चालणार नाही. राहिला प्रश्न ईजीएसअंतर्गत विहिरींचा. मी आत्ता या समितीचा अध्यक्ष झालो आहे. पंचायत समितीमध्ये सेनेची सत्ता होती. दोन वर्षांपूर्वी त्यांच्याच लोकांनी पैसे घेऊन विहिरी दिल्या. काही तरी चुकले असेल, तेव्हाच पैसे मिळाले नसतील ना, असे बंब म्हणाले.

महापालिकेच्या शाळांची लावली 'वाट'

विद्यार्थी कमी, शिक्षक जास्त : शिक्षिकेने नेमला परस्पर बदली शिक्षक

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : शहरातील गोरगरीब पालकांच्या मुलांना महापालिकेच्या शाळेशिवाय पर्याय नाही. मागील काही वर्षांपासून शाळांमध्ये विद्यार्थी संख्या झपाट्याने कमी होत असतानाही प्रशासनाने लक्ष दिले नाही. शुक्रवारी महापौर, सभापतींनी वेगवेगळ्या शाळांना अचानक भेटी दिल्यावर विदारक चित्र समोर आले. अनेक शाळांमध्ये विद्यार्थी कमी आणि शिक्षकच जास्त असल्याचे दिसून आले. एका शाळेत तर शिक्षिकेने चक्क बदली कामगाराप्रमाणे बदली शिक्षक नेमल्याचे समोर आले. याप्रकरणी शिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश पदाधिकाऱ्यांनी प्रशासनास दिले.

दहा वर्षांपूर्वी महापालिकेच्या ८२ शाळा सुरू होत्या. हळूहळू काही शाळा बंद होत गेल्या. आता ७० शाळा सुरू आहेत. मात्र, त्यातील काही शाळांची अवस्था अत्यंत वाईट आहे. शुक्रवारी सकाळी महापौर नंदकुमार घोडेले, सभापती गजानन बारवाल यांनी वेगवेगळ्या शाळांना गुपचूप भेट देण्याचे निश्चित केले. महापौर नारेगाव शाळेत पोहोचले. येथील शाळा, विद्यार्थी संख्या पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. बाजूलाच ब्रिजवाडीत मनपाची शाळा आहे. तेथील चित्र पाहून महापौरांना धक्काच बसला. शाळेच्या रेकॉर्डवर फक्त ७६ विद्यार्थी असून, आज उपस्थिती फक्त २५ जणांची होती. इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत एकच वर्ग भरविण्यात आला होता. या शाळेवर ७ शिक्षकांची नेमणूक केली आहे. येथील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा दर्जा तपासला असता महापौरांच्या पायाखालची वाळूच घसरली. शाळेत पाय ठेवताच विद्यार्थी 'गुड आफ्टरनुन मॅडम'म्हणून एका सुरात बोलू लागले. स्त्री-पुरुष यातील असमानता, स्त्रीलिंग, पुल्लिंग यातील फरकही त्यांना माहीत नव्हता. ही शाळा त्वरित बंद करण्याचा निर्णय महापौरांनी घेतला. या शाळेतील विद्यार्थी बाजूच्या विवेकानंद अकॅडमी या खाजगी शाळेत टाकण्यात येतील. त्याचा संपूर्ण खर्च महापालिका उचलेल, असेही सांगण्यात आले.

गणेश कॉलनीत वेगळीच 'शाळा'

- येथील मनपाच्या शाळेला तब्बल २ एकरचा परिसर मिळालेला आहे. शाळेत एका खाजगी व्यक्तीने २०० सिमेंट बॅग ठेवल्या आहेत. दोन खोल्यांमध्ये जनावरांची विष्ठा, दरवाजे तुटलेले, खिडक्या गायब, ही शाळाच आहे का, असा प्रश्न सभापती बारवाल यांना पडला. शाळेत मोजून २० ते २२ विद्यार्थी उपस्थित होते. शाळेवर ४ शिक्षक, एक शिपाई नेमला आहे. सर्व विद्यार्थ्यांना एकच शिक्षक शिकवत होता. अस्मा सुलताना या शिक्षिकेने तर आपल्या जागेवर बदली शिक्षक म्हणून सईद खान यांना नेमले आहे. त्यांना दरमहा शिक्षिका पाच हजार रुपये देतात, अशी कबुलीही त्याने दिली. ही शाळाही बंद करण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे.

गणेश कॉलनीतील विद्यार्थी संख्या

पहिलीत - १०, २ री-०९, ३ री-०८, ४ थी-०५, ५ वी-०५, ६ वी-०६,तर सातवीत- ०३.

शहागंज परिसरात उद्या हेरिटेज वॉक

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीतर्फे आयोजित केला जाणारा हेरिटेज वॉक रविवारी (दि.१२) सकाळी साडेसात वाजता शहागंज परिसरात होणार आहे.

चमनमधील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अर्धपुतळ्यापासून वॉक सुरु होईल.

या वॉकमध्ये निजाम आसफजहाच्या काळातील शाही मस्जिद, सहावा निजाम मेहबूब अली पाशाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त बांधलेला घड्याळाचा मनोरा, सब्जीमंडी आणि चमन परिसराच्या इतिहासाची माहिती जाणून घेता येईल.

या वॉकला विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक व इतिहासप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

जन्मशताब्दी सोहळ्याला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : ब्रह्मीभूत प. पू. योगिराज हंसतीर्थ महाराज अर्थात प. पू. अण्णा महाराज यांच्या जन्मशताब्दी सोहळ्याला बुधवारी रेणुकामाता मंदिरात भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. काकड आरतीने उत्सावाची सुरुवात झाली व त्यानंतर महोत्सवाचे विशेष ध्वजारोहण करण्यात आले. ५१ ब्रह्मवृदांच्या उपस्थितीत स्वामींच्या पादुकांना महारुद्र अभिषेक करण्यात आला. सायंकाळी राजोपचार पूजनाने जयंती दिनाची समाप्ती झाली.

जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त वर्षभर अनेक धार्मिक तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प. पू. नाना महाराज आणि प. पू. अप्पा महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा भक्तिजागर आयोजिला असून, पुढील वर्षी २७ नोव्हेंबर २०१८ रोजी सोहळ्याची सांगता होईल.

ध्वजारोहनप्रसंगी प. पू. अप्पा महाराज, अंबरीश महाराज, रेणुकादास वैद्य, पोलीस निरीक्षक काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. भाविकांनी 'योगी हंस साधना' पोथीचे सामूहिक पारायण केले. ३४ कोटी जप संकल्प विधी पार पडला. संगीत उपासनेतून होणाऱ्या या पूजनाला भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपिस्थिती होती. महाप्रसादाने दिनाची सांगता झाली.

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक १९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

महानगरपालिकेलाही विसर : संग्रामनगर पुलावरुन येणाऱ्या वाहनांची कोंडी; पोलीसही हतबल

दर्गा चौकात वाहतुकीसाठी झाडाचा अडसर

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : संग्रामनगर पूल हा शहर आणि सातारा परिसरातील नागरिकांसाठी रहदारीचा दुवाच मानला जातो; परंतु पुलावरून दर्गा चौकात आल्यावर वाहतुकीची कोंडी फुटत नसल्याने किरकोळ अपघाताला सामोरे जावे लागत आहे.

नागरिकांना रेल्वेपटरी ओलांडून ये-जा करणे धोकादायक ठरल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यामुळे पूल तयार झाला. पुरातन दरवाजामुळे रस्ता वळविण्यात आला आहे; परंतु समोरच चौकात धोकादायक चिंचेचे पुरातन झाड आजही वाहतुकीला अडसर करून उभा आहे. त्यामुळे वाहनांना पुढे जाताना अडसर होत आहे. परिणामी, किरकोळ अपघाताच्या घटना रोजच्याच झाल्या आहेत.

डावीकडे वळणाऱ्या चारचाकी वाहनाची तर तारेवरची कसरतच ठरते. दुचाकीस्वाराने मध्येच वाहन घुसविल्याने पाठीमागील वाहनाच्या रांगा पुलापर्यंत लागतात. बायपास, सातारा-देवळाई, रेल्वेस्टेशन, पैठण रोडकडे जाणाऱ्यांना हा रस्ता सोयीचा ठरत असल्याने सतत वर्दळ सुरु असते. सकाळी कारखान्यात तसेच कार्यालय, तसेच शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्यांना वाहतूक कोंडीमुळे विलंब होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. वाहतूक पोलीस फक्त विना हेल्मेटधारकांना टार्गेट करताना दिसतात. या झाडामुळे आतापर्यंत पाच लोकांचा अपघात होऊन जीव गेल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

मनपाने लक्ष द्यावे...

सातारा-देवळाई परिसरातून येणाऱ्या नागरिकांच्या जीवितास हे झाड धोकादायक ठरत असून, अपघातास कारणीभूत ठरणारे झाड मनपाने हलवावे, अशी मागणी अॅड. अंजली कुलकर्णी, डॉ. अर्चना वैद्य, नेहा गुंडेवार, ललिता चौधरी, मृणाली फुलगीकर, सविता कुलकर्णी, सुभदा पवार, भारती पवार, शर्मिष्ठा रोडगे यांनी केली.



संग्रामनगर पुलाजवळील दर्गा चौकात झाडामुळे वाहनास अडसर असून, झाडामुळे मोठा अपघातही होण्याची भीती आहे.

अपघाताची भीती...

अडथळा असल्याने याचा विचार मनपाने करायला हवा होता. धोकादायक वाहतूक सुरळीत करून विद्यार्थी, महिला नागरिकांना सुरक्षित प्रवास करता यावा. वाहनचालविताना तारेवरची कसरतच करावी लागते.

– प्रा. हेमलता लखमल

'त्या' नगरसेवकाचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : हर्षनगर वॉर्डाचा नगरसेवक मोहम्मद अयुबखान मोहम्मद हुसेनखान याने तिसऱ्यांदा दाखल केलेला अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. एस. शिंदे यांनी फेटाळला. यापूर्वी दोन वेळा जिल्हा न्यायालयाने आणि एकवेळा औरंगाबाद खंडपीठाने त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळलेला आहे.

अयुबखानविरुद्ध सिटीचौक पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल झाल्यापासून तो फरार आहे. हर्षनगर येथील व्यापारी कमलेश मधुकर चांदणे यांच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल झालेला आहे. या प्रकरणातील सहआरोपी आणि अयुबखानचे सहकारी बब्बू खान आणि माजिद खान यांना याआधीच अटक करण्यात आलेली आहे. शासनाच्या वतीने अॅड. मधुकर आहेर यांनी म्हणणे मांडले.

SHIAMAK
WINTER WORKSHOP
AURANGABAD
FREE SESSION FOR LADIES ONLY TODAY
BATCHES HAVE STARTED
Ladies Session Time: 4.00-5.00 p.m.
Enrolments Have Started
Venue : The Yellow Door, Lokmat Bhavan, Jalna Road, Aurangabad
The Yellow door
9850372800 | 0240 - 6666603
/shiamakindiaofficial @shiamakindia
www.shiamak.com
SHIAMAK Have feet. Will dance.